Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)


## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

**प्रकरण ९ ३ :**

# जेव्हा एखादा कुत्रा मुलाला चावतो. तेव्हा काय करावे ...


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवादक : डॉ. रेणू बोराळकर

पुनरावलोकन : डॉ. सुहास कुळकर्णी

श्री. उज्ज्वल करमळकर

*Convener:* Anurag Agarwal

*Members:* D Balachandar, Dinesh Tomar, Ritesh Chhabra

*Reviewer:* Manish Arya


कुत्रा किंवा तत्सम सस्तन प्राणी चावल्यास होणारा रेबीज हा आजार जीवघेणा असतो. त्यामुळे योग्य ती खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे असते. कोणत्या श्रेणीतल्या बाधेला काय करावे याची विस्तृत चर्चा आज आपण येथे पाहू.



### "माझ्या मुलाला जेव्हा कुत्रा चावतो तेव्हा त्या संबंधी वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न काय आहेत? "

प्र.१ रेबीज म्हणजे काय? रेबीजचा प्रसार कसा होतो? रेबीज हा घातक असतो का? रेबीजच्या वाढीवर परिणाम करणारे घटक कोणते आहेत?

प्र.२ प्राणी चावल्यास काय करावे? काय टाळावे?

प्र.३ जनावरांचा चावा कसा रोखायचा? एखादा प्राणी पिसाळला आहे असा संशय तुम्हाला कधी येतो?

प्र.४ जनावर चावण्यापूर्वी प्रतिबंध करणे (Pre-exposure prophylaxis) म्हणजे काय? पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या मुलांना आणि रेबीज विषाणूच्या संसर्गाचा जास्त धोका असलेल्या तसेच प्रयोगशाळेत काम करणाऱ्यांना काय सल्ला द्यायला हवा? आपल्या देशात जिथे रेबीज स्थानिक आहे तिथे सर्वांना प्रतिबंधक लस देण्याचा सल्ला का दिला जात नाही?

प्र.५ भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार आणि सर्वसामान्य नागरिक काय करु शकतात?

प्र.६ पाळीव कुत्र्यांना संसर्ग होण्यापूर्वी लसीकरण करतात, म्हणजे नेमके काय केले जाते? आणि प्राण्यांमधील रेबीजचा संसर्ग टाळण्यासाठी कोणते उपाय आहेत?

प्र.७ पूर्ण लसीकरण झालेल्या मुलाला ४ महिन्यानंतर पुन्हा कुत्र्याने चावा घेतला तर, काय उपचार केले पाहिजेत?

प्र.८ घरगुती उंदीर चावल्यास किंवा लसीकरण घेतलेल्या पाळीव कुत्र्याने चावा घेतल्यास लसीकरण आवश्यक आहे का?

प्र.९ माझ्या २ वर्षाच्या मुलाने माझ्या पाळीव कुत्र्याच्या ताटली मधून खाल्ले आणि पाणी प्यायले तर लसीकरण आवश्यक आहे का? आजारी गाईचे कच्चे दूध प्यायल्याने रेबीज हा आजार होऊ शकतो का? जर कुत्र्यांनी फक्त श्लेष्मल त्वचा चाटली असेल तर काय करावे?

प्र.१० मी खासगी रुग्णालयातून रेबीज लसीचा पहिला डोस घेतला आहे. बाकी डोस मी सरकारी रुग्णालयातून घेऊ शकतो का? विषाणू संपर्कापूर्वी डोस घेत असल्यास अन्न किंवा इतर सवयींवर काही निर्बंध आहेत का? जर संपर्कापूर्वीच्या लसीकरणाचा जर एखाद्याचा दुसरा डोस चुकला तर पुढील डोस कधी घ्यावा? तसेच २८ दिवसांनी घेण्याचा डोस ६ महिन्यांनी चुकला तर आपण सर्व ३ डोस पुन्हा पुन्हा घ्यावेत का?


Under the Auspices of the IAP Action Plan 20202021

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 20202021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# १३

# जेव्हा एखादा कुत्रा मुलाला चावतो. तेव्हा काय करावे ...

प्राणी चावण्यामध्ये कुत्रा चावणे सर्वात जास्त आढळून येते.
आपल्या देशातील ९६% रेबीज कुत्रा चावल्यामुळे नोंदवले जातात, रेबीज पिसाळलेल्या कुत्र्याच्या चाव्याद्वारे होण्याची शक्यता ५०% असली, तरी तो १००% प्राणघातक आजार आहे.



## प्र. १

## रेबीज म्हणजे काय? रेबीजचा प्रसार कसा होतो? रेबीज हा घातक असतो का? रेबीजच्या वाढीवर परिणाम करणारे घटक कोणते आहेत?

रेबीज प्राण्यांपासून माणसांमध्ये पसरणारा आजार आहे. जो रेबीज विषाणूमुळे होतो.
सामान्य लक्षणांमध्ये स्थानिक ठिकाणी वेदना होणे, खाज येणे, ताप, मरगळ, डोकेदुखी, पाण्याची भीती वाटणे, तीव्र प्रकाश, जोराचा आवाज यांचा त्रास होणे, राग येणे, उत्तेजित वाटणे, अति चंचलता आणि नंतरच्या टप्प्यात बेशुद्धावस्था यांचा सामावेश होतो.

हे प्रामुख्याने पिसाळलेल्या प्राण्याच्या लाळेतून पसरते जेव्हा तो प्राणी एखाद्याला चावतो किंवा नखाने इजा करतो. प्राण्याने जखमा किंवा चिरलेल्या त्वचेला किंवा तोंडाच्या आणि नाकाच्या अस्तराला चाटले तरीही रेबीजचा प्रसार होऊ शकतो. सामान्यत: रेबीज विषाणू पसरवणाऱ्या प्राण्यांच्या चावण्यामध्ये पाळीव कुत्री आणि मांजर, गाई आणि म्हशी सारखे मोठे रवंथ करणारे प्राणी, डुक्कर, गाढवे, घोडे, उंट इत्यादी सस्तन प्राणी तसेच वन्य प्राणी यांचा समावेश होतो. कोल्हे, आणि कोल्हाळ, माकडे, मुंगूस, अस्वल इत्यादी पासून होतो. परंतु पक्षी, खार आणि घरगुती उंदरांपासून प्रसारित होत नाही.

नेहमीच्या रेबीज विषाणूमुळे माणसांना होणारा रेबीज आजार जवळजवळ १००% प्राणघातक आहे. यावर जगात कुठेही विशिष्ट उपचार उपलब्ध नाहीत. जगात मानवी रेबीज झाल्यावर जीवंत राहिलेल्या फक्त ७% रुग्णांची नोंद झाली आहे.

**रेबीजचा आजार वाढवणारे खालील घटक आहेत :-**

- ❖ बाधेचा प्रकार
- ❖ चावायची तीव्रता
- ❖ रेबिज विषाणूचे प्रमाण
- ❖ चाव्याला जबाबदार प्राणी
- ❖ व्यक्तीची रोगप्रतिकारक स्थिती

चाव्याची जागा डोके आणि मानेच्या जखमा तसेच बोटांच्या सारख्या मज्जातंतूचे जाळे जास्त असलेल्या भागात जखम झाल्यास, मज्जातंतूंच्या उतीच्या जवळ विषाणू संसर्ग झाल्यास उष्मायन कालावधी (इन्कुबेशन कालावधी) कमी असतो.

**प्र. २**

## प्राणी चावल्यास काय करावे? काय टाळावे?

१० ते १५ मिनीटे साबणाने आणि वाहत्या पाण्याने जखम धुवावी. ज्यामुळे ९०% विषाणू निघून जातील. उपलब्ध असल्यास आयोडीनने जखम पूर्णपणे स्वच्छ करावी.

अँटी रेबीज लसीकरणाचे चार डोस ताबडतोब दंशाच्या दिवशी (शून्य दिवशी), तिसऱ्या दिवशी, सातव्या दिवशी, चौदा ते अठ्ठाविसाव्या दिवसात देणे. वरील लसी सर्व सरकारी रुग्णालय आणि खाजगी रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहेत. याला पोस्ट एक्सपोजर प्रोफायलाक्सिस (PEP) म्हणतात.



आकृती १ : प्राणी चावण्याची एक घटना

श्रेणी तीन : चाव्याद्वारे रक्तस्त्राव असलेल्या कोणत्याही चाव्याच्या बाबतीत रेबीज RIG/monoclonal अँटीबॉडीज लस लवकरात लवकर जखमेच्या ठिकाणी देणे आवश्यक आहे. हे जास्तीत जास्त जखमेच्या आसपास द्यावे. उर्वरित डोसचे इंजेक्शन वेगळ्या ठिकाणी देणे आता योग्य समजले जात नाही.

जर चाव्याची जागा अशी असेल की इंजेक्शन देणे शक्य नाही तर मोनोक्लोनाल अँटीबॉडीज जवळच्या जागेवर दिली जाऊ शकते जिथे, इंजेक्शन देणे शक्य आहे. हा विषाणू सामान्यत: चावलेल्या जागेवर वाढत जातो आणि नंतर नसांमध्ये आणि मेंदूमध्ये प्रवेश करतो. आर आय जी प्रतिपिंडे स्थानिक इंजेक्शनद्वारे त्वरित दिल्यास त्याचा परिणाम लगेच दिसून येतो आणि हा प्रसार रोखला जाऊ शकतो. रेबीज लस जखमेवर टोचू नये. धनुर्वात लस दिली नसल्यास द्यावी.

संपर्काचे प्रकार आणि चाव्याच्या श्रेणीद्वारे व्यवस्थापन

प्राण्यांच्या चाव्याच्या प्रत्येक बाबतीत काय टाळावे ?

हळद, तिखट, चुना, माती, वनस्पतीचा रस किंवा जखमेवर तेल आणि जखमेची मलमपट्टी शक्यतो टाळावे.

**तक्ता १ : संपर्काचा प्रकार आणि श्रेणी**

| श्रेणी | संपर्काचा प्रकार | उपचार |
|---|---|---|
| I | प्राण्याला स्पर्श करणे किंवा खाऊ घालणे<br>अखंड त्वचेला चाटणे | कोणतीही पोस्ट एक्सपोजरची गरज नाही. |
| II | उघड्या त्वचेला चावणे किंवा ओरखडे किंवा खरचटणे<br>रक्तस्त्राव नाही | ★ जखम स्वच्छ ठेवणे<br>★ अँटी रेबीज लस ताबडतोब देणे |
| III | एक किंवा अनेक त्वचेला घेतलेले चावे किंवा<br>ओरखडे श्लेषमल त्वचेला लागलेली लाल आणि<br>जखम झालेल्या त्वचेला चाटणे | ★ जखमेची काळजी<br>★ रेबीज इमिनोग्लोबलिन ताबडतोब देणे<br>★ अँटी रेबीज लस ताबडतोब देणे |




आकृती २ : I ते III श्रेणी I ते III चावे

- जखम शिवणे शक्यतो टाळावे त्यामुळे विषाणूचा शरीराच्या आतमध्ये प्रसार होऊ शकतो. अगदी गरज भासल्यास रेबीज आर. आय.जी. दिल्यास विरळ टाके घालावे. जखमेच्या योग्य व्यवस्थापनाने ९०% विषाणू काढून टाकले जाऊ शकतात.

## प्र. ३

### जनावरांचा चावा कसा रोखायचा? एखादा प्राणी पिसाळला आहे असा संशय तुम्हाला कधी येतो?

**कुत्रा चावण्यापासून बचाव करण्यापर्यंतच्या सूचना :-**

१. झोपलेल्या किंवा खात असलेल्या किंवा पिल्लांना खाऊ घालणाऱ्या कोणत्याही प्राण्याला त्रास देऊ नका.
२. अपरिचित प्राण्याजवळ जाऊ नका किंवा स्पर्श करु नका.
३. कुत्र्याला पाहून कधी पळू नका किंवा त्याच्याकडे टक लावून पाहू नका.
४. कुत्र्याकडे न पाहता शांत चालत राहा.
५. रस्त्यावर कुत्र्याला चीड येईल असे वागू नका.

जर तुम्हाला कुत्रा लाळ गळत असताना दिसला तर तो वेडसर असू शकतो.

पाळीव कुत्र्याला स्पर्श करण्यापूर्वी, तुम्ही त्याला पाहण्याची आणि स्पर्श करण्याची परवानगी घ्या. प्राण्यांबद्दल मानवी आणि दयाळू वृत्ती विकसीत करण्यासाठी मुलांना शिकवले पाहिजे आणि पाळीव प्राण्यांच्या चाव्यापासून रक्षण करण्यासाठी त्यांना मुलभूत सुरक्षेबाबत माहिती दिली पाहिजे.

**तुमच्या कुत्र्याला किंवा मांजरीला रेबीज झालेल्याची लक्षणे :**

विचित्र किंवा अतिसामान्य वागणूक, खोलीच्या एका कोपऱ्यात पडून राहणे, शांत पडणे इत्यादी

भरपूर लाळ येणे एखादा प्राणी खूप जणांना चावल्यास, प्राण्याची हालचाल नेहमी पेक्षा कमी भासल्यास, किंवा लकवा झाल्याप्रमाणे वागत असल्यास, असे प्राणी धोकादायक आहेत असे समजावे.

## प्र.४

### जनावर चावण्यापूर्वी प्रतिबंध करणे (Pre-exposure prophylaxis) म्हणजे काय? पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या मुलांना आणि रेबीज विषाणूच्या संसर्गाचा जास्त धोका असलेल्या तसेच प्रयोगशाळेत काम करणाऱ्यांना काय सल्ला द्यायला हवा? आपल्या देशात जिथे रेबीज स्थानिक आहे तिथे सर्वांना प्रतिबंधक लस देण्याचा सल्ला का दिला जात नाही?

पशुवैद्यकीय, विषाणू हाताळणारे प्रयोग शाळेचे कर्मचारी संक्रमित साहित्य, कुत्रे पकडणारे वन विभागाचे अधिकारी इत्यादी व्यक्तींना प्राणी चावण्याची शक्यता अधिक असते. रेबीज टाळण्यासाठी त्यांचे लसीकरण केले पाहिजे. त्यांना (PEP) प्रीएक्स्पोजर प्रोफीलॅक्सिस म्हणतात. ही लस प्रथम दिवशी, ७ व्या दिवशी व २८ व्या दिवशी दिली जाते.

उच्च जोखीम असेलेल्या व्यक्तींना रक्तातील प्रतिपिंडाची पातळी तपासणी दर ६ ते १२ महिन्यांनी केली पाहिजे. ही पातळा ०.५ IU/L च्या खाली असली, तर बूस्टर डोस घ्यावा.

❖ अभ्यासक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याचे कोणतेही सरकारी नियम नाहीत. सहसा BVSC विद्यार्थ्यांना प्राण्यांच्या संपर्कात येतात तेव्हा म्हणजे तिसऱ्या वर्षापासून क्लिनिकल पोस्टिंग असते. ते वैयक्तिकरित्या लस घेऊ शकतात.

सामुहिक लसीकरण सुरु करण्यात आलेले नाही. जनावरांच्या चाव्याच्या घटना पाच टक्क्यापेक्षा जास्त असल्यास किंवा वटवाघुळ यांच्या संपर्कात आल्यास याची शिफारस केली जाते.

भारतात प्राणी चावण्याच्या घटना सुमारे ३ टक्के असल्याचा अंदाज आहे. (हे फक्त पेरु, फिलिपीन्स देशांमध्ये दिले जाते) इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक (IAP) च्या मार्गदर्शनानुसार मुलांना त्यांच्या जिज्ञासू स्वभावामुळे आणि प्राण्यांशी खेळण्याच्या वृत्तीमुळे त्यांना ही लस दिली जाऊ शकते.

## प्र. ५

## भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार आणि सर्वसामान्य नागरिक काय करु शकतात?

आपल्या देशात (चार/एक हजार) लोकसंख्येवर कुत्री आहेत.

प्रभावी सरकारी धोरणे : मालकांनी शिक्षित करणे, कुत्र्यांची नोंदणी , कुत्र्यांचे लसीकरण, नसबंदी आणि भटक्या कुत्र्यांचे पुनर्वसन याद्वारे भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित केली जाऊ शकते.

कुत्र्यांची अंधाधुंद हत्या करण्यामागे काही त्रुटी आहेत. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार भारतात कुत्र्यांना मारणे बेकायदेशीर आहे. आणि त्या भागात अधिक नवीन तरुण कुत्र्यांची भरती होण्यास मदत होते.

नवीन कुत्रे त्यांचे स्थान स्थापित करण्यासाठी लढतात व हे रस्त्यावरील भटक्या कुत्र्यामधील आक्रमकता वाढवू शकते.

मारणे हे केवळ तात्पुरते लोकसंख्या नियंत्रणात मदत करु शकते पंरतु खरे तर यामुळे इतर कीटक, उंदीर आणि त्याच्याशी संबंधित काही गंभीर आरोग्य समस्या, प्लेग, लेप्टोस्पायरोसिस वाढू शकतात.

कुत्र्यांमध्ये निर्बिजीकरण (वृषण काढून टाकणे) आणि मादी कुत्र्यामंध्ये अंडाशय आणि गर्भाशय काढणे (spaying) आणि नंतर त्यांच्या परिसरात परत पाठवणे.

भारत सरकारचा ABC कार्यक्रम (प्राणी जन्म नियंत्रण) या द्वारे पुढे करण्यात आलेली ही सूचना आहे.

नर कुत्र्यांना निर्बिजीकरण केल्यामुळे त्यांची आक्रमकता कमी होते. मादी कुत्री आपल्या पिल्लांना सोबत असताना सहसा आक्रमक असतात. भटक्या कुत्र्यांना खायला घालण्याची प्रथा ही भटक्या कुत्र्यांची संख्या वाढवण्याचे एक कारण आहे. कुटुंबातील सदस्यांच्या शिक्षणाने याला आळा बसू शकतो.

कुत्र्यांच्या पिल्लांना रस्त्याच्या कडेला सोडून देण्याची प्रथा टाळली पाहिजे. केवळ कुटुंबांनी नाहीतर हॉटेलवाल्यांनी सुद्धा कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे. भटक्या कुत्र्यांची संख्या वाढवण्यामागे एक महत्वाचे कारण आहे.



प्र. ६

## पाळीव कुत्र्यांना संसर्ग होण्यापूर्वी लसीकरण करतात, म्हणजे नेमके काय केले जाते? आणि प्राण्यांमधील रेबीजचा संसर्ग टाळण्यासाठी कोणते उपाय आहेत?

पशुवैद्यकीय चिकित्सकांनी शिफारस केल्यानुसार पाळीव कुत्र्यांना किंवा मांजरींना रेबीज विरुद्ध लसीकरण करुन घेण्यासाठी मालकाना सांगावे आणि त्यांना वन्यप्राण्यांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. प्राण्यांना लसीला रोगप्रतिकारक प्रतिसाद मिळण्यासाठी कुत्र्याला १० आठवड्यांनी लस द्यावी आणि १४ आठवड्यांनी बुस्टर डोस द्यावा. कुत्र्यांना प्रतिवर्षी परत लसीकरण करणे गरजेचे आहे.

प्र. ७

## पूर्ण लसीकरण झालेल्या मुलाला ४ महिन्यानंतर पुन्हा कुत्र्याने चावा घेतला तर, काय उपचार केले पाहिजेत?

जर एखाद्या व्यक्तीला चार इंजेक्शनचा पूर्ण कोर्स योग्यरित्या दिला गेला असेल तर तो कोष्टक पूर्ण केल्यानंतर केवळ तीन महिन्यांसाठी सुरक्षित आहे. त्यानंतर जखमेची योग्य काळजी करावी.

फक्त शून्य आणि तिसऱ्या दिवशीचा डोस (हे प्रत्यक्षात बुस्टर डोस म्हणून काम करतात) घ्यावा.

आर आय जी ची आवश्यक नाही.

जर पूर्वीचे लसीकरण अर्धवट असेल तर नवीन केस म्हणून उपचार करावे.

सूचित केल्याप्रमाणे धनुर्वाताचे टॉक्सॉईड लस द्यावी.

## प्र.८

## घरगुती उंदीर चावल्यास किंवा लसीकरण घेतलेल्या पाळीव कुत्र्याने चावा घेतल्यास लसीकरण आवश्यक आहे का?

- ❖ अभ्यासातून असे दिसून आले आहे की घरगुती उंदीर चावल्यास लसीकरणाची आवश्यकता नाही. परंतु सामान्यपणे आक्रमक असल्यास, संशय असल्यास, जंगली उंदीर चावल्यास लसीकरण आवश्यक आहे. लसीकरण केलेल्या कुत्र्याला हा आजार होण्याची शक्यता नाही. तथापि प्राण्यांमधील विविध परिवर्तनीय परिणामकारकामुळे आणि/किंवा प्राण्यांच्या आरोग्य स्थितीमुळे रोग प्रतिकारक प्रतिसाद भिन्न असू शकतो.
- ❖ अभ्यासाने दर्शविले आहे की लसीकरण केलेल्या कुत्र्यांपैकी ६ महिन्यात ४० टक्के पर्यंत संरक्षण प्रतिपिंडे दर्शवत नाहीत तसेच ६०टक्के कुत्र्यांना एक वर्षानंतर संरक्षणात्मक titres नसतात आणि म्हणून प्रयोगशाळेच्या चाचणी शिवाय प्राणी सुरक्षित आहे याबद्दल निश्चित मत मांडता येत नाही. त्यामुळे चावणाऱ्या कुत्र्याच्या लसीकरणाची स्थिती लक्षात न घेता, चाव्याच्या स्थितीनुसार संपूर्ण PEP दिले जाते.

## प्र.९

## माझ्या २ वर्षाच्या मुलाने माझ्या पाळीव कुत्र्याच्या ताटली मधून खाल्ले आणि पाणी प्यायले तर लसीकरण आवश्यक आहे का? आजारी गाईचे कच्चे दूध प्यायल्याने रेबीज हा आजार होऊ शकतो का? जर कुत्र्यांनी फक्त श्लेष्मल त्वचा चाटली असेल तर काय करावे?

- ❖ नाही. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन पोजिशन पेपर २०१८ नुसार आजारी किंवा दुधाद्वारे प्रसार होण्याचा कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही.
- ❖ जरी कुत्र्याच्या ताटलीमधून खाल्ल्यानंतर कुत्र्याद्वारे श्लेष्मल त्वचेवर चाटणे हे श्रेणी तीन मधील एक्सपोजर बनते, त्याला ताबडतोब पाण्याने आणि साबणाने पूर्णपणे धुवावे व त्यानंतर त्या जागेवर आर. आय. जी. द्यावे किंवा आर. आय.जीसह गुळण्या कराव्या.

## प्र. १०

**मी खासगी रुग्णालयातून रेबीज लसीचा पहिला डोस घेतला आहे. बाकी डोस मी सरकारी रुग्णालयातून घेऊ शकतो का? विषाणू संपर्कापूर्वी डोस घेत असल्यास अन्न किंवा इतर सवयींवर काही निर्बंध आहेत का? जर संपर्कापूर्वीच्या लसीकरणाचा जर एखाद्याचा दुसरा डोस चुकला तर पुढील डोस कधी घ्यावा? तसेच २८ दिवसांनी घेण्याचा डोस ६ महिन्यांनी चुकला तर आपण सर्व ३ डोस पुन्हा पुन्हा घ्यावेत का?**

- इतर कोणता मार्ग नसेल तरच लसीचे ब्रँड किंवा मार्ग बदलणे योग्य नाही. पण दुसरा पर्याय नसल्यास करता येईल.
- खाण्यावर कोणतेही बंधन नाही. परंतु शक्य असल्यास दारु, जड व्यायाम तसेच स्टीरॉईटची औषधे टाळावीत. जर डोस एक किंवा दोन दिवसांनी चुकला असेल तर त्यानंतरच्या भेटीच्या वेळापत्रकात केलेल्या तारखेपासून गमावलेले दिवस जोडल्यानंतर पुढील डोस द्यावा लागेल.
- उदाहरणार्थ : जर नवव्या दिवशी सातव्या दिवसाचा डोस दिला असेल तर ३० व्या दिवशी २८व्या दिवसाचा डोस द्यावा. मध्ये जर तिसरा डोस चुकला असेल तर रुग्ण जेव्हा केंद्रात जातो तेव्हा तो दिला जाऊ शकतो.
- प्रारंभी डोस ची वैधता एक वर्षापर्यंत लागू असेल.

  एक वर्षानंतर संपूर्ण डोस कोष्टकानुसार परत द्यावे.